22 JUL 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खेळाडूंनी क्रीडा क्षेत्रातच करिअर घडवावे

## राधिका बराले यांचे आवाहन : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत चमकदार कामगिरी केलेल्या खेळाडूंचा सत्कार



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण समारंभाप्रसंगी आंतरराष्ट्रीय नेमबाज राधिका बराले, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. अविनाश असनारे, डॉ. पी. टी. गायकवाड यांच्यासमवेत पुरस्कारप्राप्त विद्यार्थी, प्रशिक्षक व संघ व्यवस्थापक.

प्रतिनिधी
कोल्हापूर

केवळ महाविद्यालयीन जीवनापुरते आपले क्रीडा कौशल्य मर्यादित न राखता खेळात करिअर करण्याबाबत खेळाडूंनी गांभिर्याने विचार करावा, असे आवाहन कोल्हापूरच्या शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या आंतरराष्ट्रीय नेमबाज राधिका हवलदार (बराले) यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे आयोजित विशेष प्रावीण्य मिळवलेल्या खेळाडूंच्या सत्कारप्रसंगी त्या बोलत होत्या. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते.

वि.स. खांडेकर भाषा भवन सभागृहात शुक्रवारी कार्यक्रम झाला. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत प्राविण्य मिळविलेल्या खेळाडूंचा गुणगौरव समारंभ व संलग्नित महाविद्यालयांतील शारीरिक शिक्षण संचालकांसाठी एक दिवसीय कार्यशाळा असा संयुक्त कार्यक्रम झाला. संत गाडगेबाबा विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. अविनाश असनारे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी २०१५–१६ मध्ये सर्वाधिक ५१४ गुणांसह अव्वल स्थान पटकावणाऱ्या कोल्हापूरच्या दि न्यू कॉलेजला सर्वोत्कृष्ट महाविद्यालय म्हणून क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी राधिका बराले म्हणाल्या, खेळाबद्दल अनास्थेचा काळ आता मागे पडला आहे. शासन क्रीडापटूंना अनेक सोयी–सुविधा उपलब्ध करून देत आहे. विविध स्पर्धांत उत्तम कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना शासनाच्या विविध सेवांमध्ये सामावूनही घेतले जात आहे. त्यामुळे चांगल्या खेळाडूंना खेळाच्या माध्यमातून आपले करिअर घडविता येऊ शकते. त्याची जाणीव ठेवून खेळाडूंनी मेहनतीने चांगले यश मिळविण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन त्यांनी केले.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी चांगला खेळाडू होण्यासाठी क्रीडासंस्कार व क्रीडा संस्कृती या दोन मूल्यांचे महत्त्व पटवून दिले. ते म्हणाले, खिलाडूवृत्ती जोपासणे हा शब्दप्रयोगच मुळी खेळाडूंनी साहित्याला प्रदान केला आहे, इतके त्यांचे महत्त्व आहे. पदक मिळाले नाही, तरी खेळाशी प्रतारणा न करणारा तो सच्चा खेळाडू होय. डॉ. अविनाश असनारे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी २०१५–१६ मधील अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत यश संपादन करणाऱ्या खेळाडूंचा ब्लेझर, शिष्यवृत्ती व स्मृतिचिन्ह देऊन तर संघ व्यवस्थापक, क्रीडा प्रशिक्षक यांचा ब्लेझर व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी जे. एच. इंगळे यांनी खेळाडूंना शपथ देवविली.

क्रीडा विभागाचे प्रभारी संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. शशिकांत दाभाडे यांनी आभार मानले.

### विद्यापीठात शूटिंग रेंज उभारावे....

यावेळी राधिका हवलदार–बराले यांनी शिवाजी विद्यापीठात नेमबाजीचे प्रशिक्षण व सराव यासाठी दर्जेदार शूटिंग रेंज उभारण्याबाबत विचार व्हावा, अशी विनंती कुलगुरूंना केली.

22 JUL 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : विद्यापीठाचा वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ वि. स. खांडेकर भाषा भवनमध्ये झाला. या वेळी कुलगुरू डॉ. शिंदे, आंतरराष्ट्रीय नेमबाज राधिका हवलदार, डॉ. असनारे, डॉ. पी. टी. गायकवाड यांच्यासमवेत पुरस्कारप्राप्त विद्यार्थी, प्रशिक्षक व संघ व्यवस्थापक.

# खेळातच करिअर करण्याचा विचार करा

## नेमबाज राधिका हवलदार : विद्यापीठात क्रीडा विभागातर्फे विद्यार्थ्यांचा गौरव

कोल्हापूर, ता. २१ : क्रीडाकौशल्य केवळ महाविद्यालयीन जीवनापुरते मर्यादित न ठेवता खेळांतच करिअर करण्याबाबत गांभीर्याने विचार करा, असे आवाहन आंतरराष्ट्रीय नेमबाज राधिका हवलदार (बराले) यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या सन २०१५-१६ मध्ये अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत प्रावीण्य मिळविलेल्या खेळाडूंचा गुणगौरव समारंभ व संलग्नित महाविद्यालयांतील शारीरिक शिक्षण संचालकांसाठी एकदिवसीय कार्यशाळा अशा संयुक्त समारंभात प्रमुख अतिथी म्हणून त्या बोलत होत्या. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. अविनाश असनारे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या वेळी २०१५-१६ मध्ये सर्वाधिक ५१४ गुणांसह अव्वल स्थान पटकावणाऱ्या कोल्हापूरच्या दि न्यू कॉलेजला सर्वोत्कृष्ट महाविद्यालय म्हणून क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. वि. स. खांडेकर भाषाभवनमध्ये कार्यक्रम झाला.

सौ. हवलदार म्हणाल्या, की खेळांबद्दल अनास्थेचा काळ आता मागे पडला असून, शासन क्रीडापटूंना अनेक सोयी-सुविधा उपलब्ध करून देत आहे. यामुळे चांगल्या खेळाडूंना खेळाच्या माध्यमातूनही आपले अतिशय चांगले करिअर घडविता येऊ शकते. डॉ. शिंदे यांनी चांगला खेळाडू होण्यासाठी क्रीडासंस्कार व क्रीडासंस्कृती या दोन मूल्यांचे महत्त्व पटवून दिले.

या वेळी विविध सांघिक व वैयक्तिक पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यात २०१५-१६मधील अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत यश संपादन करणाऱ्या खेळाडूंचा ब्लेझर, शिष्यवृत्ती व स्मृतिचिन्ह देऊन; तर संघ व्यवस्थापक, क्रीडा प्रशिक्षक यांचा गौरव झाला. जे. एच. इंगळे यांनी खेळाडूंना शपथ दिली. डॉ. पी. टी. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. शशिकांत दाभाडे यांनी आभार मानले.

22 JUL. 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठात खेळाडूंचा गौरव : न्यू कॉलेजने पटकावली 'क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर ट्रॉफी'

# मेहनतीने चांगले यश मिळवा : राधिका बराले-हवालदार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शासनाकडून क्रीडाक्षेत्र, खेळाडूंना पाठबळ मिळत आहे. त्यामुळे चांगल्या खेळाडूला क्रीडा क्षेत्रात करिअर करणे शक्य झाले आहे. ते लक्षात घेऊन मेहनतीने चांगले यश मिळविण्यासाठी खेळाडूंनी प्रयत्न करावेत, असे आवाहन शिवछत्रपती पुरस्कार विजेती व आंतरराष्ट्रीय नेमबाजपटू राधिका बराले-हवालदार हिने शुक्रवारी येथे केले.



नसीर अत्तार

कोल्हापुरात शुक्रवारी शिवाजी विद्यापीठामध्ये सन २०१५-१६ मध्ये अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत प्रावीण्य मिळविलेल्या विद्यापीठ कार्यक्षेत्रातील खेळाडूंचा गौरव कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि आंतरराष्ट्रीय नेमबाजपटू राधिका बराले-हवालदार यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. अविनाश असनारे, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठातील क्रीडा विभागातर्फे आयोजित सन २०१५-१६ मध्ये अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत प्रावीण्य मिळविलेल्या खेळाडूंच्या गौरव समारंभामध्ये ती बोलत होती. विद्यापीठाच्या 'वि. स. खांडेकर भाषा भवना'तील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, तर संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. अविनाश असनारे प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, खिलाडूवृत्ती जोपासणे हा शब्दप्रयोगच मुळी खेळाडूंनी साहित्याला प्रदान केला आहे, इतके त्यांचे महत्त्व आहे. नकारात्मक विचारांवर मात करीत इतरांशी स्पर्धा न करता स्वत:शीच गुणात्मक व दर्जात्मक स्पर्धा केल्यास यश निश्चितपणे मिळते.

सन २०१५-१६ मध्ये सर्वाधिक ५१४ गुणांसह क्रीडा कामगिरीमध्ये अव्वलस्थानी राहिलेल्या कोल्हापूरच्या न्यू कॉलेजला सर्वोत्कृष्ट महाविद्यालयासाठीची क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमात विविध सांघिक व वैयक्तिक पुरस्कारांचे वितरण प्रमुख उपस्थितांच्या हस्ते झाले. यात सन २०१५-१६ मधील अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत यश संपादन करणाऱ्या खेळाडूंना ब्लेझर, शिष्यवृत्ती व स्मृतिचिन्ह देऊन आणि संघ व्यवस्थापक, क्रीडा प्रशिक्षक यांना ब्लेझर व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

यावेळी जे. एच. इंगळे यांनी खेळाडूंना शपथ दिली. क्रीडा विभागाचे प्रभारी संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. दीपक डांगे यांनी सूत्रसंचालन केले. शशिकांत दाभाडे यांनी आभार मानले.

> कोल्हापुरात चांगले नेमबाजपटू आहेत त्यांना या ठिकाणी सराव करता यावा यासाठी विद्यापीठात दर्जेदार शूटिंग रेंज उभारण्याबाबत विचार व्हावा, अशी विनंती या कार्यक्रमात राधिका बराले हिने कुलगुरू डॉ. शिंदे यांना केली. यावर त्यांनी विद्यापीठात अद्ययावत शूटिंग रेंज निश्चितपणे उभारली जाईल, अशी ग्वाही दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JUL 2017
लोकमत




कोल्हापुरात शुक्रवारी शिवाजी विद्यापीठामध्ये सन २०१५-१६ मधील क्रीडा क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट महाविद्यालयासाठीची क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर ट्रॉफी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. एन. व्ही. नलवडे यांना प्रदान करण्यात आली. यावेळी डावीकडून अमर सासने, आंतरराष्ट्रीय नेमबाजपटू राधिका बराले-हवालदार, डॉ. अविनाश असनारे, पी. टी. गायकवाड, खो-खो पटू ऋतुजा पाटील, आदी उपस्थित होते.

---

कार्यक्रमात विविध क्रीडा प्रकारातील कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील एकूण ४५ खेळाडू, चार प्रशिक्षक व चार संघव्यवस्थापकांना गौरविण्यात आले. त्यानंतर शारीरिक शिक्षण संचालकांसाठी 'शारीरिक शिक्षण' या विषयावर दुपारी एक ते सायंकाळी पाच वाजता कार्यशाळा झाली. त्यात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. अविनाश असनारे, 'इलाईट'चे संस्थापक संचालक डॉ. रोहन चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यशाळेचा समारोप झाला.

“ तब्बल बारा वर्षांनी माझ्या कॉलेजला शिवाजी विद्यापीठाची ही ट्रॉफी पटकाविता आली आहे. त्याचे श्रेय आमचे खेळाडू, प्रशिक्षकांना आहे. पूर्वी आमचा केवळ फुटबॉलमध्ये सहभाग असायचा. आता ॲथलेटिक्समध्ये ठसा उमटवत आहोत. क्रीडा क्षेत्रात आमची प्रगती सुरु असल्याचा आनंद आहे.

\- डॉ. एन. व्ही. नलवडे,
प्राचार्य, न्यू कॉलेज

22 JUL 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खेळात करिअर करा : बराले

## विद्यापीठाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आपले क्रीडाकौशल्य केवळ महाविद्यालयीन जीवनापुरते मर्यादित न राखता खेळांतच करिअर करण्याबाबत गांभियनि विचार करा, असे आवाहन कोल्हापूरच्या शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या आंतरराष्ट्रीय नेमबाज राधिका हवालदार-बराले यांनी शुक्रवारी येथे उदयोन्मुख क्रीडापटूंना केले.

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या सन २०१५-१६ मध्ये अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत प्रावीण्य मिळविलेल्या खेळाडूंचा गुणगौरव समारंभ व संलग्नित महाविद्यालयांतील शारीरिक शिक्षण संचालकांसाठी एक दिवसीय कार्यशाळा अशा संयुक्त कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून राधिका बराले बोलत होत्या. वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. अविनाश असनारे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी सन २०१५-१६ मध्ये सर्वाधिक ५१४ गुणांसह अव्वल स्थान पटकावणाऱ्या कोल्हापूरच्या दी न्यू कॉलेजला सर्वोत्कृष्ट महाविद्यालय म्हणून क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या गुणगौरव समारंभात बोलताना राधिका हवालदार-बराले. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. अविनाश असनारे व डॉ. पी. टी. गायकवाड आदी.**

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. अविनाश असनारे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी सन २०१५-१६ मधील अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत यश संपादन करणाऱ्या खेळाडूंचा ब्लेझर, शिष्यवृत्ती व स्मृतिचिन्ह देऊन, तर संघ व्यवस्थापक, क्रीडा प्रशिक्षक यांचा ब्लेझर व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी जे. एच. इंगळे यांनी खेळाडूंना शपथ दिली. क्रीडा विभागाचे प्रभारी संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी स्वागत केले. शशिकांत दाभाडे यांनी आभार मानले.

### विद्यापीठात शूटिंग रेंज उभारण्याचा विचार व्हावा

कोल्हापुरात नेमबाजी मोठ्या प्रमाणात रुजत चालली आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठात नेमबाजीचे प्रशिक्षण व सराव यासाठी दर्जेदार शूटिंग रेंज उभारण्याबाबत विचार व्हावा, अशी विनंती बराले यांनी कुलगुरूंना भाषणातून केली. नेमबाजी रेंजसाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन यावेळी कुलगुरू डॉ. शिंदे यांनी दिले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 2 JUL 2017
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ निवडणूक मतदार याद्यांसाठी मुदतवाढ

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा आणि विद्या परिषद निवडणुकीसाठी मतदार याद्या तयार करण्याकरिता प्राचार्य, महाविद्यालयीन शिक्षक, विद्यापीठ शिक्षक तसेच संस्था प्रतिनिधी यांची माहिती पाठविण्यासाठी संबंधित महाविद्यालये, शैक्षणिक संस्था यांना सोमवार २४ जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर दिली.

राज्यात १ मार्च २०१७ पासून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ लागू झाला आहे. त्यानुसार विविध अधिकार मंडळांच्या निवडणुका घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. अधिसभा आणि विद्या परिषद निवडणुकीच्या मतदार याद्यांसाठी प्राचार्य,



महाविद्यालयीन शिक्षक, विद्यापीठ शिक्षक तसेच संस्था प्रतिनिधी यांची माहिती पाठविण्यासाठी संबंधित महाविद्यालये, शैक्षणिक संस्था यांना आस्थापना पीजी विभागाकडून ३० जूनपर्यंत पाठविण्यासाठी ▶▶ पान २ वर

## शिवाजी विद्यापीठ निवडणूक मतदार याद्यांसाठी मुदतवाढ

कळविण्यात आले होते. याला दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली होती. एकूण २८१ महाविद्यालयांपैकी ११६ महाविद्यालयांतील शिक्षकांची माहिती प्राप्त झाली आहे. अद्यापही १६५ महाविद्यालयांकडून शिक्षकांची माहिती तसेच काही प्राचार्य आणि संस्था प्रतिनिधी यांची माहितीही शैक्षणिक संस्थांकडून प्राप्त झालेली नाही. अधिसभा आणि विद्या परिषद या अधिकार मंडळांमध्ये शिक्षक, प्राचार्य, संस्था प्रतिनिधी यांचे प्रतिनिधित्व महत्त्वाचे असल्याने व प्राप्त झालेल्या माहितीचे प्रमाण कमी असल्याने संबंधित घटकांकडून माहिती पाठविण्याची मुदत २४ जुलैपर्यंत वाढविण्यात आली आहे. संबंधितांनी माहिती विद्यापीठ कार्यालयाकडे तातडीने सादर करावी, असे आवाहन कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी केले.

22 JUL 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ निवडणूक मतदार यादीस मुदतवाढ

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा व विद्यापरिषद निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्यासाठी २४ जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तरी प्राचार्य, महाविद्यालयीन शिक्षक, विद्यापीठ शिक्षक तसेच संस्था प्रतिनिधी यांची माहिती पाठविण्यासाठी संबंधित महाविद्यालये, शैक्षणिक संस्थांनी वेळेत पाठवावी, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

राज्यात १ मार्चपासून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ लागू करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने विविध अधिकार मंडळांच्या निवडणुका घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. अधिसभा व विद्यापरिषद निवडणुकीच्या मतदार यादी तयार करून, प्राचार्य, महाविद्यालयीन शिक्षक, विद्यापीठ शिक्षक तसेच संस्था प्रतिनिधी यांची माहिती पाठविण्यासाठी संबंधित



महाविद्यालये, शैक्षणिक संस्था यांना आस्थापना पीजी विभागाकडून यापूर्वी ई-मेल व पत्राद्वारे कळविण्यात आले होते. दोन वेळा मुदतवाढ देवूनसुध्दा २८१ महाविद्यालयांपैकी साधारणत: ११६ महाविद्यालयांतील शिक्षकांची माहिती प्राप्त झाली आहे. अधिसभा व विद्यापरिषद या अधिकार मंडळांमध्ये शिक्षक, प्राचार्य, संस्था प्रतिनिधी यांचे प्रतिनिधीत्व महत्वाचे असून, प्राप्त झालेल्या माहितीचे प्रमाण कमी असल्याने माहिती पाठविण्याची मुदत वाढविण्यात आली असून ही माहिती कार्यालयाकडे तातडीने सादर करावी.